

# 'सोंगटी'नाटक पाहून मुली भारावल्या

**पुणे :** पंख सामाजिक संस्था व क्विकहिल फाऊंडेशनच्या शाळांगण प्रकल्पाअंतर्गत कै. बाबूराव सणस कन्याशाळा, मंगळवार पेठ येथे नुकताच मुलींच्या शिक्षणावर आधारित 'सोंगटी' या नाटकाचा प्रयोग सादर करण्यात आला. मराठी अभिनेत्री माधवी सोमण व अंजली धारू यांनी सादर केलेले नाटक पाहून मुली भारावून गेल्या.

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त नाटकाचा प्रयोग आयोजित करण्यात आला होता. या नाटकाला कै. बाबूराव सणस कन्या शाळा व वसंतदादा पाटील शाळेच्या मुली आणि त्यांचे पालक उपस्थित होते. नाटक पाहिल्यानंतर शाळेतील मुलींनी आपले मनोगत व्यक्त केले.

कै. बाबूराव सणस शाळेची विद्यार्थिनी मोनिका दरेकर म्हणाली, 'मुलींवर सध्या खूप काही बंधने लादली जातात. मुलींना कमी लेखले जाते, मुली काही करू शकत नाहीत, असा काही लोकांचा समज आहे. मात्र मुलीने ठरवले तर ती काही करु शकते हे या नाटकातून समजले. स्त्रीने नवरा, सासू-सासरे यांचा छळ सहन न करता त्याला तोंड दिले पाहिजे, हा या नाटकातून धडा मिळाला. तसेच शिक्षण हे स्त्रीसाठी किती आवश्यक आहे याचा बोध झाला.

वसंतदादा पाटील शाळेची विद्यार्थिनी वैष्णवी म्हणाली 'या नाटकामधील सोंगटीने तिच्या समोर उद्‌भवलेल्या संकटांचा ज्या प्रकारे सामना केला, त्या प्रकारे सामान्य जीवनात मुलींनीदेखील संकटांना जिद्दीने सामोरे गेले पाहिजे.'

प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षण मंडळ अध्यक्षा वासंती काकडे आणि शिक्षणाधिकारी दीपक माळी, क्विकहील फाउंडेशनचे सीएसआर प्रमुख अजय शिर्के, बाबूराव सणस शाळेच्या मुख्याध्यापिका निर्मला कांबळे, पंख संस्थेच्या विश्वस्त सीमा ननावरे, विश्वस्त कल्याणी भाबड, प्रसाद भिरंगे, संचालिका स्मिता आपटे उपस्थित होत्या.